Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune 411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए. फा.प्लॉ.नं.१७८,१७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

E-Mail- secretary.stateboard@gmail.com

Tel : Chairman (p) : STD . (020)-25551751 . I EPABX-25705000 Secretary(P) : STD . (020)- 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-८/ ६९१ / ३१०८
पुणे-४११००४
दिनांक -०९/०२/२०२२.
१२

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय- कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२ करिता परीक्षार्थी, मुख्याध्यापक/प्राचार्य, केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक, परिरक्षक व विभागीय मंडळस्तरावरील सर्व घटकांसाठी मार्गदर्शक सूचना...

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मार्च-एप्रिल- २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षांतर्गत लेखी परीक्षा दि. ०४/०३/२०२२ ते दि.३०/०३/२०२२ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षांतर्गत लेखी परीक्षा दि.१५/०३/२०२२ ते दि.०४/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तसेच अन्य परीक्षांचा तपशीलही आपणांस विदित करण्यात आलेला आहे.

सदर परीक्षांच्या अनुषंगाने कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर संबंधित विविध घटकांना पुढीलप्रमाणे विशेष मार्गदर्शक सूचना राज्यमंडळामार्फत निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

१. परीक्षार्थ्यांना लेखी परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शक सूचना (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा)
२. मुख्याध्यापक/प्राचार्यासाठी विशेष मार्गदर्शक सूचना –प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प इ. व लेखी परीक्षा (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा)
३ केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालकांसाठी मार्गदर्शक सूचना (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा)
४. परिरक्षकांसाठी मार्गदर्शक सूचना (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी)परीक्षा)
५. विभागीय मंडळस्तरावरील सर्व घटकांना मार्गदर्शक सूचना (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा)

उपरोक्तप्रमाणे सूचना पत्रासोबत पाठविण्यात येत असून त्या सूचनांची तसेच यापूर्वी पाठविण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांची या परीक्षेसाठी काटेकोर अंमलबजावणी होईल याबाबत सर्व घटकांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. सदर मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन मार्च-एप्रिल २०२२ इ.१२ वी व इ.१० वी परीक्षेबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ,पुणे.

क्र. कोविमं/डीपी/मार्च-एप्रिल २०२२/
दिनांक १४.०२.२०२२

सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य / मुख्याध्यापक, सातारा / सांगली / कोल्हापूर यांनी सोबतच्या सूचनांचे वाचन करून सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देवून ऑनलाईन सभेस उपस्थित राहणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी. ऑनलाईन सभेची सूचना शिक्षणाधिकारी (माध्य) यांचे मार्फत कळविण्यात येईल.

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
## कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित
## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२
## परीक्षार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना
# लेखी परीक्षा

१. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात येईल. १५ पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या ठिकाणी एकापेक्षा अधिक उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये एकत्र करून परीक्षा घेण्यात येईल. एखादा विद्यार्थी आरोग्यविषयक कारणामुळे परीक्षेस गैरहजर राहिल्यास अशा गैरहजर विद्यार्थ्यांना मंडळामार्फत आयोजित पुरवणी परीक्षेस प्रचलित पध्दतीने प्रविष्ट होता येईल.

२. **मार्च-एप्रिल २०२२** मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा अंतर्गत लेखी परीक्षा **दि.०४/०३/२०२२ ते दि.३०/०३/२०२२** या कालावधीत प्रचलित पध्दतीने (ऑफलाईन) आयोजित करण्यात आलेली आहे.

३. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह शाळा उशीराने सुरू झालेल्या आहेत. तद्नतर काही ठिकाणी त्या वेळोवेळी बंद ठेवाव्या लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव पुरेसा होऊ न शकल्यामुळे लेखी परीक्षेतील पेपरचा वेळ या परीक्षेला ७० ते १०० गुणांच्या पेपरसाठी ३० मिनिटे व ४० ते ६० गुणांच्या पेपरसाठी १५ मिनिटे वाढविण्यात आला असून त्यानुसार अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे.

४. या जादा वेळेव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जादा वेळेसह इतर सर्व सुविधा व सवलती कायम राहतील.
(उदा. तीन तासाच्या पेपरसाठी या परीक्षेला ३ तास ३० मिनीटे देण्यात आलेली आहे. या वेळेव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदर तीन तासांच्या पेपरसाठी ६० मिनीटे प्रचलित जादा वेळेची सवलत देय राहील.)

५. सदर लेखी परीक्षेस **प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना २५ टक्के कपात केलेला अभ्यासक्रम वगळून उर्वरित ७५ टक्के अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा दयावी लागणार आहे.**

६. परीक्षा संचालनाची संपूर्ण जबाबदारी केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक म्हणून नियुक्त केलेल्या संबंधित घटकांची/उच्च माध्यमिक शाळा वा कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

७. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या सर्व घटकांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

८. इ.१२ वी परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्यामुळे परीक्षार्थ्यांनी Thermal Screening साठी परीक्षेच्या प्रत्यक्ष वेळेपूर्वी किमान एक ते दीड तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे. परीक्षा केंद्राच्या मुख्यप्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रथम परीक्षार्थ्यांसह सर्व घटकांचे Thermal Screening द्वारे तापमान मोजण्यात येईल.

९. विद्यार्थ्यांचे तापमान तपासल्यानंतर प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर आपल्या निर्धारित परीक्षा कक्षामध्ये बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी स्थानापन्न होईल असे पहावे. प्रत्यक्ष लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात येईल.

१०. परीक्षा केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तथापि, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रात येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझरची छोटी बाटली सोबत ठेवावी. तसेच मास्क व लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुध्दा स्वतःसोबत आणणे आवश्यक राहील. परीक्षार्थी/विद्यार्थ्याने एकमेकांचे पेन, पेन्सिल वापरु नये.

११. परीक्षेपूर्वी वा परीक्षेदरम्यान एखादया परीक्षार्थ्यास कोरोना प्रादुर्भावाच्या अनुषंगाने त्रास झाल्यास व त्याची परीक्षा देण्याची इच्छा असल्यास परीक्षार्थ्याच्या संमतीने त्याची परीक्षा केंद्रात स्वतंत्र कक्षात बैठक व्यवस्था करण्यात येईल.

१२. कोविड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता खबरदारी म्हणून परीक्षा केंद्र/उपकेंद्राजवळील शासकीय आरोग्य केंद्रामार्फत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाला विनंती करण्यात यावी.

१३. परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थ्यांमध्ये पुरेसे अंतर ठेवून बैठक व्यवस्था झिग-झॅग (Zig-Zag) पध्दतीने करण्यात येईल त्यामुळे विद्यार्थ्यांनी निर्धारित बैठक व्यवस्थेचे पालन करुन परीक्षा दयावी तसेच शारीरिक अंतर राखले जाईल याची दक्षता घ्यावी.

१४. कोविड -१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण-तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी, पालक व संबंधित घटक यांच्या शंकांचे निरसन व मार्गदर्शन करण्यासाठी राज्यमंडळ व विभागीय मंडळ स्तरावर स्वतंत्रपणे नियंत्रण कक्ष/हेल्पलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच राज्यमंडळ व विभागीय मंडळ स्तरावर समुपदेशकही नेमण्यात आलेले आहेत.

१५. प्रत्येक पेपरच्या वेळी परीक्षा केंद्र/उपकेंद्रात प्रवेश करतांना व पेपर संपल्यावर बाहेर जातांना विद्यार्थ्यांनी गर्दी टाळण्याच्या दृष्टीने आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन करावे.

****************************************

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
## कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित
## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२
## मुख्याध्यापक/प्राचार्यांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना
## प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प, इ.

१. अ) कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर बहुतांश उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह सुरु ठेवण्यास कमी कालावधी मिळाल्याने प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, प्रकल्प व तत्सम परीक्षेसाठी मंडळामार्फत स्वतंत्र सूचना व कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. ती विचारात घेवून सदर परीक्षा दि.१४/०२/२०२२ ते दि.०३/०३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात याव्यात. प्रयोग वही (जर्नल) व अनुषंगिक लेखन/प्रकल्प कार्य उपरोक्त कालावधीत जमा करुन घेण्यात यावे.

**महत्वाचे**- मंडळाने उपरोक्तप्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी कोरोनाबाधित झाल्यामुळे अथवा अन्य वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षा देवू न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर दि.३१/०३/२०२२ ते दिनांक १८/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात यावी. Out of Turn चा कालावधी उपरोक्त कालावधीतच समाविष्ट असेल त्यामुळे Out of Turn साठी स्वतंत्र कालावधी देण्यात येणार नाही. यापूर्वी प्रयोग वही (जर्नल) व अनुषंगिक लेखन/प्रकल्प कार्य सादर न करु शकलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत या कालावधीत ते जमा करण्याची संधी देण्यात यावी.

ब) विज्ञान, कला, वाणिज्य व व्यावसायिक शाखातील विषयांची श्रेणी, तोंडी व इतर अंतर्गत मूल्यमापन परीक्षा घेण्याची जबाबदारी संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेली आहे. त्यामुळे श्रेणी, तोंडी व इतर अंतर्गत मूल्यमापन परीक्षा प्रचलित मूल्यमापन आराखडयानुसार तसेच कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भावाची परिस्थिती विचारात घेऊन निर्धारित कालावधीत पार पाडावी.

२. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस अंतर्गत मूल्यमापन असलेल्या सर्व विषयांच्या परीक्षेबाबत खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे.

अ) कोविड-१९ विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेऊन विषयनिहाय प्रात्यक्षिकांची संख्या किमान ४०% करण्यात आलेली आहे.

ब) या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परिक्षक संबंधित उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालयातूनच घेण्यात यावेत. ज्या कनिष्ठ महाविद्यालयात एका विषयासाठी एकापेक्षा अधिक विषय शिक्षक उपलब्ध नाहीत तेथे त्याच उपलब्ध विषय शिक्षकाकडून अंतर्गत व बहिस्थ परिक्षकाचे काम करुन घ्यावे.

३. कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व संबंधितांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

४. उपरोक्त कालावधीत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात यावी. याशिवाय, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझर सोबत ठेवण्याबाबत तसेच मास्क व लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुद्धा स्वतःसोबत आणण्याबाबत परीक्षार्थ्यांना सूचित करावे.

५.प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करताना कोविड-१९ च्या प्रादूर्भावासंदर्भातील सूचनांचे पालन करण्याच्या दृष्टिने उपलब्ध जागेचा विचार करून विद्यार्थ्यांच्या बॅचेस तयार कराव्यात.

६.विद्यार्थ्यांना व अन्य घटकांना कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देताना त्यांचे तापमान मोजण्यात यावे तसेच महाविद्यालयातील संपूर्ण कालावधीत विद्यार्थी व सर्व संबधितांनी मास्क वापरणे अनिवार्य राहील.

७.कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कोणत्याही प्रकारे गर्दी होणार नाही व शारीरिक अंतर राखले जाईल याची दक्षता घ्यावी. आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन करावे.

८.प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी परीक्षा दालनात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती काळजी घ्यावी.

९.कनिष्ठ महाविद्यालयाच्या आवारातील कचरा कुंडया झाकून ठेवाव्यात.

१०.स्वच्छतागृह वेळोवेळी निर्जतूंकीकरण करुन घ्यावीत.

११.प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प इ. परीक्षेच्या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयाच्या आवारामध्ये बाहय घटकांना प्रवेश देण्यात येवू नये.

१२.प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प इ. परीक्षेच्या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयाच्या आवाराबाहेर बाहय व असंबंधित घटकांनी गर्दी करु नये यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी.

१३.कोविड -१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण-तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी, पालक व संबंधित घटक यांच्या शंकांचे निरसन व मार्गदर्शन करण्यासाठी राज्यमंडळ व विभागीय मंडळ स्तरावर स्वतंत्रपणे नियंत्रण कक्ष/हेल्पलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच राज्यमंडळ व विभागीय मंडळ स्तरावर समुपदेशकही नेमण्यात आलेले आहेत. सदर बाब संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

------------------------****------------------------

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
## कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित
## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२
## मुख्याध्यापक/प्राचार्यांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना
# लेखी परीक्षा

१. मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची लेखी परीक्षा दि.०४/०३/२०२२ ते दि.३०/०३/२०२२ या कालावधीत प्रचलित पध्दतीने (ऑफलाईन) आयोजित करण्यात आलेली आहे.

२. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात येईल. १५ पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या ठिकाणी एकापेक्षा अधिक उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये एकत्र करून परीक्षा घेण्यात येईल. अशा प्रकरणी प्राचार्यांने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था त्यांना परीक्षेपूर्वी माहित करुन दयावी. कोणताही विद्यार्थी या कारणास्तव परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

एखादा विद्यार्थी आरोग्यविषयक कारणामुळे परीक्षेस गैरहजर राहिल्यास अशा गैरहजर विद्यार्थ्यांना मंडळामार्फत आयोजित पुरवणी परीक्षेस प्रचलित पध्दतीने प्रविष्ट होता येईल.

३. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह शाळा उशीराने सुरू झालेल्या आहे. तदनंतर काही ठिकाणी त्या वेळोवेळी बंद ठेवाव्या लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव पुरेसा होऊ न शकल्यामुळे लेखी परीक्षेतील पेपरचा वेळ या परीक्षेला ७० ते १०० गुणांच्या पेपरसाठी ३० मिनिटे व ४० ते ६० गुणांच्या पेपरसाठी १५ मिनिटे वाढविण्यात आला असून त्यानुसार अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे.

४. या जादा वेळेव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जादा वेळेसह इतर सर्व सुविधा व सवलती कायम राहतील.
(उदा. तीन तासाच्या पेपरसाठी या परीक्षेला ३ तास ३० मिनीटे देण्यात आलेली आहे. या वेळव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदर तीन तासाच्या पेपरसाठी ६० मिनीटे प्रचलित जादा वेळेची सवलत देय राहील.)

५. **सदर लेखी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना २५ टक्के कपात केलेला अभ्यासक्रम वगळून उर्वरित ७५ टक्के अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा दयावी लागणार आहे.**

६. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या सर्व घटकांनी कोविड-१९ विषाणू प्रादूर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

७. इ.१२ वी परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्यामुळे परीक्षार्थ्यांनी Thermal Screening साठी परीक्षेच्या प्रत्यक्ष वेळेपूर्वी किमान एक ते दीड तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करावे. परीक्षा केंद्राच्या मुख्यप्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रथम परीक्षार्थ्यांसह परीक्षेशी संबंधित सर्व घटकांचे Thermal Screening द्वारे तापमान मोजण्यात यावे.

८. विद्यार्थ्यांचे तापमान तपासल्यानंतर प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर म्हणजेच सकाळ सत्रात १०.०० वाजता विद्यार्थी आपल्या निर्धारित परीक्षा कक्षामध्ये बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी स्थानापन्न होणेबाबत सूचना देण्यात याव्यात. प्रत्यक्ष लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात येईल.

९. परीक्षा केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझारची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तथापि, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रात परीक्षेसाठी येताना स्वत:ची पाण्याची बाटली व सॅनिटायझर छोटी बाटली सोबत ठेवावी. तसेच मास्क व लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुध्दा स्वत:सोबत आणणे आवश्यक राहील. परीक्षार्थी/विद्यार्थ्यांनी एकमेकांचे पेन, पेन्सिल, कंपास वापरु नये याबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१०. एखादा विद्यार्थी कोविड-१९ विषाणूने बाधित झालेला असल्यास अशा विद्यार्थ्याची माहिती केंद्रसंचालकांना अगोदर देण्यात यावी.

११. परीक्षेपूर्वी वा परीक्षेदरम्यान एखादया परीक्षार्थ्यास कोरोना प्रादुर्भावाच्या अनुषंगाने त्रास झाल्यास व त्याची परीक्षा देण्याची इच्छा असल्यास परीक्षार्थ्यांच्या संमतीने त्याची परीक्षा केंद्रात स्वतंत्र कक्षात बैठक व्यवस्था करण्यात येईल.

१२. कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता खबरदारी म्हणून परीक्षा केंद्र/उपकेंद्राजवळील शासकीय आरोग्य केंद्रामार्फत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाला विनंती करण्यात यावी.

१३. परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थ्यांमध्ये पुरेसे अंतर ठेवून बैठक व्यवस्था झिग-झॅग (Zig-Zag) पध्दतीने करण्यात येईल त्यामुळे विद्यार्थ्यांनी निर्धारित बैठक व्यवस्थेचे पालन करुन परीक्षा दयावी तसेच शारीरिक अंतर राखले जाईल याची दक्षता घेण्याबाबत विद्यार्थी व पालकांना सूचित करावे.

१४. प्रत्येक पेपरच्या वेळी परीक्षा केंद्र/उपकेंद्रात प्रवेश करतांना व पेपर संपल्यावर बाहेर जातांना विद्यार्थ्यांनी गर्दी टाळण्याच्या दृष्टीने आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन करण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचना दयाव्यात.

१५. कोविड -१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण-तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी, पालक व संबंधित घटक यांच्या शंकांचे निरसन व मार्गदर्शन करण्यासाठी राज्यमंडळ व विभागीय मंडळ स्तरावर स्वतंत्रपणे नियंत्रण कक्ष/हेल्पलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच राज्यमंडळ व विभागीय मंडळ स्तरावर समुपदेशकही नेमण्यात आलेले आहेत.

१६. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी) परीक्षेच्या मूळ उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर ( Question Paper Set Code) चा रकाना दोन ठिकाणी दर्शविण्यात आलेला असून त्यात विद्यार्थी अथवा पर्यवेक्षकाने कोणतीही नोंद करु नये.

उपरोक्त सर्व सूचना शाळेच्या दर्शनी भागातील नोटीस बोर्डवर, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात तसेच शाळेने तयार केलेल्या विद्यार्थी व पालकांच्या व्हॉटस् अॅप ग्रुपवर प्रसिध्द कराव्यात.

------------ *** ------------

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
## कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित
## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च-एप्रिल- २०२२
## केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालकांसाठी मार्गदर्शक सूचना

### परीक्षेचे वेळापत्रक

१. मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची लेखी परीक्षा दि. ०४/०३/२०२२ ते दि.३०/०३/२०२२ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) ची लेखी परीक्षा दि.१५/०३/२०२२ ते दि.०४/०४/२०२२ या कालावधीत प्रचलित पध्दतीने(ऑफलाईन) आयोजित करण्यात येत आहेत.

२. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह शाळा उशीराने सुरू झालेल्या आहेत. तद्नंतर काही ठिकाणी त्या वेळोवेळी बंद ठेवाव्या लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव पुरेसा होऊ न शकल्यामूळे लेखी परीक्षेतील पेपरचा वेळ या परीक्षेला ७० ते १०० गुणांच्या पेपरसाठी ३० मिनिटे व ४० ते ६० गुणांच्या पेपरसाठी १५ मिनिटे वाढविण्यात आला असून त्यानुसार अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे.

३. या जादा वेळेव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जादा वेळेसह इतर सर्व सुविधा व सवलती कायम राहतील.

(उदा. तीन तासाच्या पेपरसाठी या परीक्षेला ३ तास ३० मिनीटे देण्यात आलेली आहे. या वेळव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदर तीन तासाच्या पेपरसाठी ६० मिनीटे प्रचलित जादा वेळेची सवलत देय राहील.)

**४. सदर लेखी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना २५ टक्के कपात केलेला अभ्यासक्रम वगळून उर्वरित ७५ टक्के अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा दयावी लागणार आहे.**

### परीक्षेची बैठक व्यवस्था

५. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात येईल. १५ पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या ठिकाणी एकापेक्षा अधिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये एकत्र करून परीक्षा घेण्यात येईल. मंडळामार्फत निश्चित केलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालये ही प्रचलित पध्दतीने मुख्य केंद्र राहतील व अन्य जोडण्यात आलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालये ही उपकेंद्र राहतील. मुख्य परीक्षा केंद्र असलेले शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य हे केंद्रसंचालक राहतील तसेच ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालय जोडण्यात आलेले आहे, त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य हे उपकेंद्रसंचालक म्हणून कार्यरत राहतील.

६. विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था ही त्याच्या स्वत:च्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात यावी. मुख्य केंद्राच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी मुख्य केंद्रात व उपकेंद्राच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी संबंधित उपकेंद्रातून परीक्षेसाठी प्रविष्ट होतील. मुद्दा क्र.५ प्रमाणे अपवादात्मक परिस्थितीत एकापेक्षा अधिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये एकत्र करून उपकेंद्र

निश्चितीकरण केलेले असल्यास विभागीय मंडळाने निश्चित केलेल्या एकाच उपकेंद्रावर विद्यार्थी प्रविष्ट होतील.

७. विद्यार्थ्यांची परीक्षा कक्षात बैठक व्यवस्था करण्यासाठी इमारतीतील जास्तीत जास्त आकारमानाच्या खोल्यांचा/ हॉलचा वापर करावा. वर्गखोलीमध्ये बैठक व्यवस्थेसाठी बेंच मांडणी करताना जास्तीत जास्त जागेचा वापर करुन दोन बेंचमध्ये पुरेसे अंतर ठेवावे. वर्गखोलीत प्रत्येक बेंचवर एक विद्यार्थी याप्रमाणे झिग-झॅग (Zig-Zag) पध्दतीने बैठक व्यवस्था करण्यात यावी.

८. आपत्कालीन परिस्थितीत/ कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची इमारत अधिग्रहित/प्रतिबंधित करण्याची शक्यता असल्यास अथवा विलगीकरण केंद्र/क्वारंटाईन सेंटर म्हणून घेण्याची शक्यता असल्यास संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून यथोचित कार्यवाही करावी.

९. **उपरोक्तप्रमाणे बैठक व्यवस्था करताना प्रत्येक विद्यार्थ्याची सर्व विषयांची परीक्षा एकाच परीक्षा केंद्र/उपकेंद्रावर घेण्याचे नियोजन करण्यात यावे.**

१०. **मुख्य केंद्राच्या केंद्रसंचालकांनी परीक्षेपूर्वी प्रचलित पध्दतीने पर्यवेक्षक व अनुषंगिक घटकांची सभा आयोजित करावी. सदर बैठकीमध्ये अधिनस्त उपकेंद्रातील उपकेंद्रसंचालक, बिल्डींग कन्डक्टर व अनुषंगिक घटकांनाही समाविष्ट करुन घ्यावेत.**

११. **सर्व मुख्य केंद्र व उपकेंद्रांवर सदर परीक्षांसाठी किमान आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक/मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.**

## कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर घ्यावयाची दक्षता

१२. परीक्षेपूर्वी परीक्षा मुख्य केंद्र/उपकेंद्राची इमारत, सर्व वर्ग खोल्या, स्वच्छतागृहे व संपूर्ण परिसराची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्यात यावे. आवारातील कचरा कुंडया झाकून ठेवाव्यात. परीक्षा कालावधीत स्वच्छतागृहांची वेळोवेळी स्वच्छता करण्यात यावी व स्वच्छतागृहात साबण किंवा हॅन्डवॉश ठेवण्यात यावा.

१३. परीक्षा केंद्राच्या मुख्यप्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांना प्रवेश देताना सर्व परीक्षार्थ्यांसह अन्य सर्व घटकांचे Thermal Screening द्वारे तापमान घेण्यात यावे. परीक्षेसंबंधीत सर्व घटकांचे (पर्यवेक्षक, शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी, पोलीस इत्यादी) Thermal Screening करण्यात यावे. तसेच मास्क, सॅनिटायझर वापरणे संदर्भात सूचना देण्यात याव्यात. परीक्षार्थ्यांच्या जवळ गैरमार्ग प्रकरणाशी संबंधित कोणतेही आक्षेपार्ह साहित्य असल्यास ते काढून ठेवण्याबाबत आवाहन करावे.

परीक्षार्थ्याचे तापमान मर्यादेपेक्षा जास्त आढळून आल्यास त्याची कल्पना विद्यार्थ्यांना/पालकांना देण्यात यावी. परीक्षार्थ्याची परीक्षा देण्याची इच्छा असल्यास परीक्षार्थ्यांच्या/पालकांच्या संमतीने त्याची परीक्षा घेण्यात यावी. अशा विद्यार्थ्याची बैठक व्यवस्था स्वतंत्र कक्षात करून आरोग्य विषयक सर्व सूचनांचे पालन करण्यात यावे. कोविड-१९ विषाणूचा प्रादूर्भाव जाणवणाऱ्या संभाव्य परीक्षार्थ्यांची उत्तरपत्रिका स्वतंत्र पाकिटात ठेवण्यास विद्यार्थ्यास सांगावे, सदर पाकिट सिलबंद करुन ते परिरक्षकांमार्फत विभागीय मंडळात स्वतंत्रपणे जमा करावे.

१४.इ.१० वी व इ.१२ वी परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्यामुळे परीक्षार्थ्यांनी Thermal Screening साठी परीक्षेच्या प्रत्यक्ष वेळेपूर्वी किमान एक ते दीड तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहाण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करण्यात आलेले आहे, त्याकरीता आवश्यक पूर्वतयारी किमान दीड ते दोन तास अगोदर परीक्षा केंद्राच्या मुख्यप्रवेशद्वारावर करुन ठेवावी. विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रथम परीक्षार्थ्यांसह परीक्षेशी संबंधित सर्व घटकांचे Thermal Screening द्वारे तापमान घेऊन प्रवेश देताना कोविड-१९ विषाणू प्रादूर्भावाच्या अनुषंगाने शासनाने/आरोग्य विभागाने दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करावे.

१५.परीक्षा केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझरची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी. तथापि, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनाही परीक्षा केंद्रात परीक्षेसाठी येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझरची छोटी बाटली सोबत आणण्याबाबत तसेच मास्क व लेखन साहित्य (उदा- पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुध्दा स्वतःसोबत आणण्याबाबत सूचित केलेले आहे. त्यामुळे सदर साहित्य परीक्षा कक्षात नेण्यास परवानगी देण्यात यावी. **लेखी परीक्षेकरिता कॅल्क्युलेटर किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर परीक्षार्थी करणार नाही याची दक्षता घ्यावी.**

१६. विद्यार्थ्यांव्यतिरिक्त परीक्षेशी संबंधित नसणाऱ्या अन्य कोणत्याही घटकांना परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येऊ नये.

## परीक्षा कक्षात परीक्षार्थ्यांना प्रवेश

१७.मुख्य प्रवेशव्दारावर विद्यार्थ्यांचे तापमान तपासल्यानंतर प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर म्हणजेच सकाळ सत्रात १०.०० वाजता विद्यार्थी आपल्या निर्धारित परीक्षा कक्षामध्ये बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी स्थानापन्न होईल असे पहावे. प्रत्यक्ष लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात यावी.

१८. इ.१० वी व इ.१२ वी परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली असल्याने सदर परीक्षेसाठी घंटेचे वेळापत्रक असावे.

## प्रश्नपत्रिका वितरण व उत्तरपत्रिका संकलन व्यवस्थापन

१९. केंद्रसंचालकांनी आपल्या केंद्रासाठी व आपल्या अधिनस्त सर्व उपकेंद्रासाठी विषयनिहाय विद्यार्थी संख्या विचारात घेऊन आवश्यक उत्तरपत्रिका, पुरवण्या व इतर साहित्य लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी उपलब्ध करुन दयाव्यात. उपकेंद्रसंचालकांनी देखील सदर साहित्य पुरेसे असल्याची खात्री करावी. लेखी परीक्षेदरम्यान वेळोवेळी केंद्रसंचालक व उपकेंद्रसंचालक यांनी सदर साहित्याबाबत आढावा घेऊन आवश्यकता असल्यास परिरक्षक/विभागीय मंडळाकडून उपलब्ध करुन घ्याव्यात. उपकेंद्रसंचालकाने परीक्षा संपल्यानंतर त्या त्या दिवशी उर्वरित प्रश्नपत्रिकांची पाकिटे मुख्य केंद्राकडे जमा करावी. उर्वरित स्टेशनरी व इतर साहित्य संपूर्ण परीक्षा संपल्यानंतर मुख्य केंद्रावर जमा करावेत.

२०. केंद्रसंचालकांना दोन प्रतीत सेंटर हॉलरीज देण्यात येईल. सदर हॉलरीज पैकी एक मुख्य प्रत मुख्य केंद्रासाठी व दुसरी प्रत उपकेंद्रासाठी असेल. यामध्ये परीक्षा केंद्र/उपकेंद्रातील दिनांक, विषय, माध्यम व प्रविष्ट विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक इ. माहितीचा समावेश असेल. या हॉलरीजनुसार प्रत्येक दिवसाची बैठक व्यवस्था परीक्षा केंद्र व उपकेंद्रावर स्वतंत्रपणे करण्यात यावी.

२१. हॉलरीजप्रमाणे प्रत्येक दिवशी सत्रनिहाय परीक्षा केंद्र/उपकेंद्रास आवश्यक प्रश्नपत्रिकांची संख्या विचारात घेऊन प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे परिरक्षकांमार्फत मुख्य केंद्रास प्रचलित पध्दतीप्रमाणे वितरीत केली जातील. हॉलरीजमधला तपशील विचारात घेऊन उपकेंद्रासाठी आवश्यक असणारी प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे मुख्य परीक्षा केंद्रामार्फत उपकेंद्रास पुरविण्यात यावीत.

२२.इ.१० वी परीक्षेसाठी शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र (७७) या विषयास प्रविष्ट होणा-या पुनर्परीक्षार्थ्यांसाठी/श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी प्रश्नपत्रिकांच्या पाकिटांचा रंग **पिवळा (Yellow)** व इ. १२ वी (सर्वसाधारण अभ्यासक्रम) परीक्षेसाठी एन.एस.क्यू.एफ. अंतर्गत व्यावसायिक विषय Electronics & Hardware Installation Technician Peripherals (E- 5) व कलेचा इतिहास व रसग्रहण (६०), भारतीय संगीताचा इतिहास व विकास (६५), तालवाद्य (६९) या विषयांना प्रविष्ट होणा-या पुनर्परीक्षार्थ्यांसाठी /श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी प्रश्नपत्रिकांच्या पाकिटांचा रंग **गुलाबी (Pink)** असेल.

२३.इ.१० वी व इ.१२ वीच्या उर्वरित सर्व विद्यार्थ्यांसाठी २५ प्रश्नपत्रिकांचे एक याप्रमाणे **ब्राऊन/खाकी** (Brown) रंगाची पाकिटे पुरविण्यात येतील.

२४.केंद्रसंचालकांना त्यांच्या मुख्य केंद्र व उपकेंद्र यांना वितरीत करावयाच्या प्रश्नपत्रिका परिरक्षकाकडून मुख्य केंद्रावर सकाळ सत्रात साधारणपणे ८.५० वाजता पुरविण्यात येतील. मुख्य केंद्र व उपकेंद्र यामधील अंतर विचारात घेवून सदर वेळेचे प्रकरणपरत्वे वेगळे नियोजन विभागीय मंडळाच्या सूचना/आदेश विचारात घेवून करण्यात येईल. उपकेंद्रामध्ये प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थी संख्येच्या आधारे मुख्य केंद्रसंचालकांनी उपकेंद्रसंचालकांना सिलबंद पाकिटे पुरवावीत. केंद्रसंचालकाने मुख्य केंद्र आणि उपकेंद्र यांच्यातील अंतर विचारात घेऊन उपकेंद्रावर सिलबंद पाकिटे ४० मिनिटे अगोदर पोहचतील असे नियोजन करावे.

परिरक्षकाकडून मुख्य केंद्रावर प्रश्नपत्रिका दुपार सत्रात साधारणपणे १.२० वाजता पुरविण्यात येतील. मुख्य केंद्र व उपकेंद्र यामधील अंतर विचारात घेवून सदर वेळेचे प्रकरणपरत्वे वेगळे नियोजन विभागीय मंडळाच्या सूचना/आदेश विचारात घेवून करण्यात येईल. मुख्य केंद्रसंचालकानी उपकेंद्रामध्ये प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थी संख्येच्या आधारे उपकेंद्रसंचालकांना सिलबंद पाकिटे पुरवावीत. केंद्रसंचालकाने मुख्य केंद्र आणि उपकेंद्र यांच्यातील अंतर विचारात घेऊन उपकेंद्रावर सिलबंद पाकिटे ४० मिनिटे अगोदर पोहचतील असे नियोजन करावे.

२५.प्रश्नपत्रिकांचे सिलबंद पाकिट विहित पध्दतीने परीक्षा कक्षात उघडल्यानंतर गैरहजर परीक्षार्थी किंवा अन्य कारणांमुळे शिल्लक राहीलेल्या प्रश्नपत्रिका पेपर संपेपर्यंत पर्यवेक्षकाने स्वत:कडेच जतन करुन ठेवाव्यात. त्याचा गैरवापर होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. तसेच पेपर संपल्यानंतर सदर शिल्लक प्रश्नपत्रिका केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालकाकडे जमा कराव्यात.

२६.मुख्य केंद्र ते उपकेंद्र प्रश्नपत्रिका वितरण करण्यासाठी परिरक्षकांनी मुख्य केंद्रसंचालकाशी विचारविनिमय करुन योग्य व्यक्तीची सहायक परिरक्षक (रनर) म्हणून नियुक्ती करावी. ही नियुक्ती करताना माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकाव्यतिरिक्त अन्य व्यक्तींची (उदा. जिल्हा परिषद/म.न.पा. शाळांचे केंद्रप्रमुख, पदवीधर शिक्षक ) संमतीने नियुक्ती करावी. सदर व्यक्तींनी मुख्य परीक्षा केंद्रातून प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे वेळेत ताब्यात घेवून ती उपकेंद्रावर पोहचवावी.

तसेच संपूर्ण परीक्षा कालवधीत बैठे पथक म्हणून उपकेंद्रावर कार्यरत रहावे. परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिकांचे संकलन करुन त्या मुख्य केंद्रावर उत्तरपत्रिका फॉर्म नं. १,२ व ३ सह जमा कराव्यात.

२७. उपकेंद्रावरील सर्व उत्तरपत्रिका व अनुषंगिक बाबी २० मिनिटात सर्व कामकाज पूर्ण करुन ३० मिनिटात मुख्य केंद्रावर पोहचतील असे नियोजन करावे. मुख्य केंद्राने उपकेंद्रावरुन प्राप्त झालेल्या उत्तरपत्रिकांचे व इतर साहित्यांचे संकलन करुन तद्नंतर ३० मिनिटात परिरक्षकांकडे पोहचतील असे पहावे. अपवादात्मक परिस्थितीत अंतराचा विचार करून याबाबत विभागीय मंडळ स्तरावरुन प्राप्त होणा-या सूचना विचारात घेवून कार्यवाही करावी.

२८. मुख्य केंद्रसंचालकाने इतर सर्व अनुषंगिक बाबींची कार्यवाही परिरक्षक/केंद्रसंचालक/सहकेंद्रसंचालक इ.साठीच्या मार्गदर्शक सूचना पुस्तिकेनुसार करण्यात यावी. प्रत्येक मुख्य केंद्र व प्रत्येक उपकेंद्राला परिरक्षक /विभागीय मंडळामार्फत सदर पुस्तिका पुरविण्यात येतील.

२९. प्रत्येक पेपर संपल्यानंतर आरोग्य विषयक सर्व सूचनांचे पालन करुन विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका संकलित कराव्यात. तद्नंतर विद्यार्थ्यांना वर्गखोली बाहेर पाठवावे. एकाचवेळी गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. परीक्षा संपल्यानंतर कोणत्याही परीक्षार्थ्याने परीक्षा केंद्रावर अनावश्यक थांबू नये.

३०. या परीक्षेसाठी शाळा तिथे केंद्र/उपकेंद्र अशी व्यवस्था केली असल्याने परीक्षेची गोपनीयता पाळणे, परीक्षेचे संचलन विना तक्रार सुरक्षित वातावरणात पार पाडणे तसेच मुख्य केंद्र/उपकेंद्र परिसरात परीक्षेशिवाय अन्य घटक उपस्थित राहणार नाहीत, याची सर्वस्वी जबाबदारी केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक यांची राहील. केंद्र/उपकेंद्रावर कोणताही गैरप्रकार घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालकांची राहील.

३१. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी) परीक्षेच्या मूळ उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर (Question Paper Set Code) चा रकाना दोन ठिकाणी दर्शविण्यात आलेला असून त्यात विद्यार्थी अथवा पर्यवेक्षकाने कोणतीही नोंद करु नये.

## अतिशय महत्वाचे-

१ केंद्रसंचालकाने स्वतःच्या केंद्राच्या व अधिनस्त उपकेंद्रांच्या संदर्भातील मार्च-एप्रिल २०२२ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांचा दैनंदिन गैरमार्ग प्रकरण, विद्यार्थ्यांची उपस्थिती/अनुपस्थिती व अनुषंगिक माहिती प्रत्येक पेपर संपल्यानंतर ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. सदर माहिती ऑनलाईन सादर केल्यानंतरच उत्तरपत्रिका फॉर्म नं.१ व २ सह परिरक्षकाकडे जमा करुन घेण्यात येईल.

२ उपरोक्तप्रमाणे दैनंदिन माहिती ऑनलाईन भरण्यासाठी प्रत्येक केंद्रसंचालकांना लिंक चा तपशील विभागीय मंडळामार्फत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

सदर लिंकवर मुख्य केंद्राने माहिती भरुन नोंदणी करावी लागेल. सदर नोंदणी लेखी परीक्षा सुरु होण्याआधी दोन दिवस अगोदर पूर्ण करणे आवश्यक राहील.

३. मुख्य केंद्राने स्वतःची संबधित माहिती ऑनलाईन पध्दतीने भरावी तसेच आपल्या अधिनस्त सर्व उपकेंद्रांकडून सदर माहिती वेळेत प्राप्त करुन घेऊन भरावी. मुख्य परीक्षा केंद्र व सर्व अधिनस्त उपकेंद्रांची माहिती भरुन झाल्यानंतर केंद्रसंचालकांना दिवस/सत्रनिहाय स्वतःच्या व अधिनस्त उपकेंद्राच्या भरलेल्या माहितीचा तपशील लॉग-इन केल्यानंतर दिसू शकेल. सदर माहिती पूर्णपणे भरल्याची खात्री करावी.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
## कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित
## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२
## परिरक्षकांसाठी मार्गदर्शक सूचना

### परीक्षेचे वेळापत्रक

१. मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) ची लेखी परीक्षा दि.०४/०३/२०२२ ते दि.३०/०३/२०२२ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) ची लेखी परीक्षा दि.१५/०३/२०२२ ते दि.०४/०४/२०२२ या कालावधीत प्रचलित पध्दतीने(ऑफलाईन) आयोजित करण्यात येत आहेत.

२. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह शाळा उशीराने सुरू झालेल्या आहेत. तद्नंतर काही ठिकाणी त्या वेळोवेळी बंद ठेवाव्या लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव पुरेसा होऊ न शकल्यामूळे लेखी परीक्षेतील पेपरचा वेळ या परीक्षेला ७० ते १०० गुणांच्या पेपरसाठी ३० मिनिटे व ४० ते ६० गुणांच्या पेपरसाठी १५ मिनिटे वाढविण्यात आला असून त्यानुसार अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे.

३. या जादा वेळेव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जादा वेळेसह इतर सर्व सुविधा व सवलती कायम राहतील.
(उदा. तीन तासाच्या पेपरसाठी या परीक्षेला ३ तास ३० मिनीटे देण्यात आलेली आहे. या वेळेव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदर तीन तासाच्या पेपरसाठी ६० मिनीटे प्रचलित जादा वेळेची सवलत देय राहील.)

४. **सदर लेखी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना २५ टक्के कपात केलेला अभ्यासक्रम वगळून उर्वरित ७५ टक्के अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा दयावी लागणार आहे.**

### परीक्षेची बैठक व्यवस्था

५. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात येईल. १५ पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या ठिकाणी एकापेक्षा अधिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये एकत्र करून परीक्षा घेण्यात येईल. मंडळामार्फत निश्चित केलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालये ही प्रचलित पध्दतीने मुख्य केंद्र राहतील व अन्य जोडण्यात आलेल्या शाळा/कनिष्ठ ही महाविद्यालये उपकेंद्र राहतील. मुख्य परीक्षा केंद्र असलेले शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य हे केंद्रसंचालक राहतील तसेच ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालय जोडण्यात आलेले आहे, त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य हे उपकेंद्रसंचालक म्हणून कार्यरत राहतील.

६. विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था ही त्यांच्या स्वत:च्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात यावी. मुख्य केंद्राच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी मुख्य केंद्रात व उपकेंद्राच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी संबधित उपकेंद्रातून परीक्षेसाठी प्रविष्ट होतील. मुद्दा क्र.५ प्रमाणे अपवादात्मक परिस्थितीत एकापेक्षा अधिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये एकत्र करून उपकेंद्र निश्चितीकरण केलेले असल्यास विभागीय मंडळाने निश्चित केलेल्या एकाच उपकेंद्रावर विद्यार्थी प्रविष्ट होतील.

७. विद्यार्थ्यांची परीक्षा कक्षात बैठक व्यवस्था करण्यासाठी इमारतीतील जास्तीत जास्त आकारमानाच्या खोल्यांचा/ हॉलचा वापर करण्यात येणार आहे. वर्गखोलीमध्ये बैठक व्यवस्थेसाठी बेंच मांडणी करताना जास्तीत जास्त जागेचा वापर करुन दोन बेंचमध्ये पुरेसे अंतर ठेवणे, वर्गखोलीत प्रत्येक बेंचवर एक विद्यार्थी याप्रमाणे झिग-झॅग (Zig-Zag) पध्दतीने बसवण्याबाबत आणि बैठक व्यवस्थेसाठी शक्यतो मोठया आकारमानाच्या वर्गखोल्या/हॉल वापरण्याबाबत केंद्रसंचालक /उपकेंद्रसंचालकांना सूचित केलेले आहे, याप्रमाणे कार्यवाही होत असल्याची खातरजमा करावी.

८. आपत्कालीन परिस्थितीत/ कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची इमारत अधिग्रहित/प्रतिबंधित करण्याची शक्यता असल्यास अथवा विलगीकरण केंद्र/क्वारंटाईन सेंटर म्हणून घेण्याची शक्यता असल्यास संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून यथोचित कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. याबाबत आवश्यकता भासल्यास आपणही आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करावी.

९. उपरोक्तप्रमाणे बैठक व्यवस्था करताना प्रत्येक विद्यार्थ्यांची सर्व विषयांची परीक्षा एकाच परीक्षा केंद्र/उपकेंद्रावर घेण्याचे नियोजन केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक यांचेमार्फत होईल असे पहावे.

## कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर घ्यावयाची दक्षता

१०. परीक्षेपूर्वी परिरक्षण केंद्राच्या वर्ग खोल्या, स्वच्छतागृहे व संपूर्ण परिसराची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्यात यावे. आवारातील कचरा कुंडया झाकून ठेवाव्यात. परीक्षा कालावधीत स्वच्छतागृहांची वेळोवेळी स्वच्छता करण्यात यावी व स्वच्छतागृहात साबण किंवा हॅन्डवॉश ठेवण्यात यावा.

११. परिरक्षण केंद्राच्या मुख्यप्रवेशद्वारावर सर्व घटकांचे Thermal Screening द्वारे तापमान घेण्यात यावे. तसेच मास्क, सॅनिटायझर वापरणे संदर्भात सूचना देण्यात याव्यात. तापमान मर्यादेपेक्षा जास्त असल्यास अशा प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

१२. इ.१०वी व इ.१२ वी परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्यामुळे **मुख्य परीक्षा** केंद्रावर सकाळ सत्रात सकाळी ०८.५० पर्यंत व दुपार सत्रात दुपारी ०१.२० पर्यंत प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे पोहोच करणे आवश्यक राहील. **तसेच उपकेंद्रावर** सकाळ सत्रात सकाळी ०९.५० पर्यंत व दुपार सत्रात दुपारी ०२.२० पर्यंत प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे पोहोच करणे आवश्यक राहील. सदर वेळा तसेच परिरक्षक केंद्रापासून मुख्य परीक्षा केंद्र व उपकेंद्रांची

अंतरे व प्रवासासाठी लागणारा कमाल वेळ विचारात घेऊन परिरक्षण केंद्र उघडणे, Thermal Screening द्वारे तापमान घेणे, परीक्षा केंद्रनिहाय प्रश्नपत्रिका पाकीटांची विभागणी करणे व ती परीक्षा केंद्रावर पोहचविणे इत्यादीबाबत परिरक्षकांनी नियोजन करुन कार्यवाही करावी. अपवादात्मक परिस्थितीत उपरोक्त कार्यवाहीला अधिकचा वेळ लागणा-या प्रकरणात विभागीय मंडळाच्या सूचना/आदेश विचारात घेवून कार्यवाही करावी.

१३.परिरक्षण केंद्रावर येणाऱ्या सर्व घटकांकडून कोविड-१९ विषाणू प्रादूर्भावाच्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या आरोग्य विषयक सर्व सूचनांचे पालन होणे बंधनकारक राहील.

१४.परिरक्षण केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझरची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी. तथापि, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने परिरक्षण केंद्रात येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझरची छोटी बाटली सोबत आणण्याबाबत तसेच मास्क आणण्याबाबत संबधितांना सूचित करावे.

१५. परिरक्षण केंद्रात कार्यरत असणाऱ्या व येणाऱ्या सर्व घटकांमध्ये पुरेसे अंतर राहील याची दक्षता घ्यावी. तसेच प्रश्नपत्रिका वितरित करणे, उत्तरपत्रिका जमा करणे, उत्तरपत्रिकेवर युआयडी स्टिकर लावणे, उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तयार करणे व इतर सर्व अनुषंगिक कामे करतानादेखील पुरेसे अंतर ठेवावे आणि शासन व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करुन कार्यवाही करावी.

१६. परिरक्षण केंद्रातील कामाशी संबंधित नसणाऱ्या अन्य कोणत्याही घटकांना परिरक्षण केंद्रात प्रवेश देण्यात येऊ नये.

## प्रश्नपत्रिका वितरण व उत्तरपत्रिका संकलन व्यवस्थापन

१७. परिरक्षकांनी आपल्या केंद्रासाठी आपल्या अधिनस्त सर्व उपकेंद्रासाठी विषयनिहाय विद्यार्थी संख्या विचारात घेऊन आवश्यक उत्तरपत्रिका, पुरवण्या व इतर साहित्य लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी उपलब्ध झाले असल्याची केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक यांच्याकडून खातरजमा करुन घ्यावी. लेखी परीक्षेदरम्यान वेळोवेळी केंद्रसंचालक व उपकेंद्रसंचालक यांचेकडून सदर साहित्याबाबत आढावा घेऊन आवश्यकता असल्यास ते परिरक्षक/विभागीय मंडळाकडून उपलब्ध करुन दयावे.

१८. उर्वरित प्रश्नपत्रिकांची पाकिटे, फॉर्म नं.१ व २ आणि अनुषंगिक अहवाल त्या त्या दिवशी तसेच शिल्लक स्टेशनरी व इतर साहित्य परीक्षा संपल्यानंतर मुख्य केंद्र व उपकेंद्र यांच्याकडून जमा करुन विभागीय मंडळाकडे देण्यात यावे.

१९. केंद्रसंचालकांना दोन प्रतीत सेंटर हॉलरीज देण्यात येईल. सदर हॉलरीज पैकी एक मुख्य प्रत मुख्य केंद्रासाठी व दुसरी प्रत उपकेंद्रासाठी असेल. यामध्ये परीक्षा केंद्र/उपकेंद्रातील दिनांक, विषय, माध्यम व प्रविष्ट विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक इ. माहितीचा समावेश असेल. या हॉलरीजनुसार प्रत्येक दिवसाची बैठक व्यवस्था परीक्षा केंद्र व उपकेंद्रावर स्वतंत्रपणे करण्याबाबत केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

२०. हॉलरीजप्रमाणे प्रत्येक दिवशी सत्रनिहाय परीक्षा केंद्र/उपकेंद्रास आवश्यक प्रश्नपत्रिकांची संख्या विचारात घेऊन प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे परिरक्षकामार्फत मुख्य केंद्रास प्रचलित पध्दतीप्रमाणे वितरीत केली जातील. हॉलरीजमधील तपशील विचारात घेऊन उपकेंद्रासाठी आवश्यक असणारी प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे मुख्य परीक्षा केंद्रामार्फत उपकेंद्रास निर्धारित वेळेत पुरवली जातील याबाबत दक्षता घ्यावी.

२१.इ.१० वी परीक्षेसाठी शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र (७७) या विषयास प्रविष्ट होणा-या पुनर्परीक्षार्थ्यांसाठी/श्रेणीसुधार योजनेतर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी प्रश्नपत्रिकांच्या पाकिटांचा रंग **पिवळा** (Yellow) व इ. १२ वी (सर्वसाधारण अभ्यासक्रम) परीक्षेसाठी एन.एस.क्यू.एफ. अंतर्गत व्यावसायिक विषय Electronics & Hardware Installation Technician Peripherals (E- 5) व कलेचा इतिहास व रसग्रहण (६०), भारतीय संगीताचा इतिहास व विकास (६५), तालवाद्य (६९) या विषयांना प्रविष्ट होणा-या पुनर्परीक्षार्थ्यांसाठी /श्रेणीसुधार योजनेतर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी प्रश्नपत्रिकांच्या पाकिटांचा रंग **गुलाबी** (Pink) असेल.

२२.इ.१० वी व इ.१२ वीच्या उर्वरित सर्व विद्यार्थ्यांसाठी २५ प्रश्नपत्रिकांचे एक याप्रमाणे **ब्राऊन/खाकी** (Brown) रंगाची पाकिटे पुरविण्यात येतील.

उपरोक्त क्र.२२ व २३ मधील बाब लक्षात घेऊन प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे वितरित करण्यात यावीत.

२३.प्रश्नपत्रिकांचे सिलबंद पाकिट विहित पध्दतीने परीक्षा कक्षात उघडल्यानंतर गैरहजर परीक्षार्थी किंवा अन्य कारणांमुळे शिल्लक राहीलेल्या प्रश्नपत्रिका पेपर संपेपर्यंत पर्यवेक्षकाने स्वत:कडेच जतन करुन ठेवणे, त्याचा गैरवापर होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घेणे तसेच पेपर संपल्यानंतर सदर शिल्लक प्रश्नपत्रिका केंद्रसंचालकाकडे जमा करणे इत्यादीबाबत सूचना संबधितांना देण्यात आलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी होत असल्याची आपल्या स्तरावरुन वेळोवेळी खातरजमा करावी.

२४. परिरक्षण केंद्र ते मुख्य केंद्र प्रश्नपत्रिका वितरण करण्यासाठी प्रचलित पध्दतीने परिरक्षकाने सहायक परिरक्षकांची (रनर) नियुक्ती करावी. मुख्य केंद्र ते उपकेंद्र प्रश्नपत्रिका वितरण करण्यासाठी परिरक्षकांनी मुख्य केंद्रसंचालकांशी विचारविनिमय करुन योग्य व्यक्तींची सहायक परिरक्षक (रनर) म्हणून नियुक्ती करावी. ही नियुक्ती करताना माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांची अथवा अन्य व्यक्तींची (उदा. जिल्हा परिषद/म.न.पा. शाळांचे केंद्रप्रमुख, पदवीधर शिक्षक) संमतीने नियुक्ती करावी. सदर व्यक्तींनी मुख्य परीक्षा केंद्रातून प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे वेळेत ताब्यात घेवून ती उपकेंद्रावर पोहचवावी. तसेच संपूर्ण परीक्षा कालवधीत बैठे पथक म्हणून उपकेंद्रावर कार्यरत रहावे. परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिकांचे संकलन करुन त्या मुख्य केंद्रावर उत्तरपत्रिका फॉर्म नं. १,२ व ३ सह जमा करतील व तदनंतर मुख्य केंद्रावरील सहायक परिरक्षक (रनर) सर्व उत्तरपत्रिका फॉर्म नं. १ व २ सह संबधित कागदपत्रे परिरक्षकाकडे जमा करतील.

२५. उपकेंद्रावरील सर्व उत्तरपत्रिका व अनुषंगिक बाबी २० मिनीटात सर्व कामकाज पूर्ण करुन ३० मिनीटात मुख्य केंद्रावर पोहचतील असे नियोजन करावे. मुख्य केंद्राने उपकेंद्रावरुन प्राप्त झालेल्या उत्तरपत्रिकांचे व इतर साहित्याचे संकलन करुन तदनंतर ३० मिनीटात परिरक्षकांकडे पोहचवाव्यात अशा सूचना केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक यांना देण्यात आलेल्या आहेत त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घ्यावी. अपवादात्मक परिस्थितीत परिरक्षकाने विभागीय मंडळाकडून सूचना/आदेश घेवून प्रकरणपरत्वे निर्णय घ्यावा.

२६. परिरक्षकाने इतर सर्व अनुषंगिक बाबींची कार्यवाही परिरक्षक / केंद्रसंचालक /सहकेंद्रसंचालक इ.साठीच्या मार्गदर्शक सूचना पुस्तिकेनुसार करण्यात यावी. प्रत्येक परिरक्षक केंद्र, मुख्य केंद्र व प्रत्येक उपकेंद्राला सदर पुस्तिका विभागीय मंडळामार्फत पुरविण्यात येतील.

२७. परीक्षेपूर्वी कामाचे नियोजन करण्यासाठी परिरक्षकाने सभेचे आयोजन करावे. सदर सभेकरीता सर्व मुख्य केंद्रसंचालक, सर्व उपकेंद्रसंचालक, मुख्य केंद्रासाठी नियुक्त सहायक परिरक्षक व सर्व उपकेंद्राचे रनर तसेच परिरक्षक कार्यालयाचे सर्व कर्मचारी यांना सभेसाठी आमंत्रित करुन सदर सभेत उपरोक्तप्रमाणे कामाचे नियोजन व तणावमुक्त वातवरणात काम करण्याकरीता सविस्तर सूचना देण्यात याव्यात.

## अतिशय महत्वाचे-

१. केंद्रसंचालकाने स्वतःच्या केंद्राच्या व अधिनस्त उपकेंद्रांच्या संदर्भातील मार्च-एप्रिल २०२२ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांचा दैनंदिन गैरमार्ग प्रकरण, विद्यार्थ्यांची उपस्थिती/अनुपस्थिती व अनुषंगिक माहिती प्रत्येक पेपर संपल्यानंतर ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. सदर माहिती ऑनलाईन सादर केल्यानंतरच उत्तरपत्रिका फॉर्म नं.१ व २ सह परिरक्षकाकडे जमा करुन घेण्यात येईल.

२ उपरोक्तप्रमाणे दैनंदिन माहिती ऑनलाईन भरण्यासाठी प्रत्येक केंद्रसंचालकांना लिंक चा तपशील विभागीय मंडळामार्फत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. सदर लिंकवर मुख्य केंद्राने माहिती भरुन नोंदणी करावी लागेल. सदर नोंदणी लेखी परीक्षा सुरु होण्याआधी दोन दिवस अगोदर पूर्ण करणे आवश्यक राहील.

३.मुख्य केंद्राने स्वतःची संबंधित माहिती ऑनलाईन पध्दतीने भरावी तसेच आपल्या अधिनस्त सर्व उपकेंद्रांकडून सदर माहिती वेळेत प्राप्त करुन घेऊन भरावी. मुख्य परीक्षा केंद्र व सर्व अधिनस्त उपकेंद्रांची माहिती भरुन झाल्यानंतर केंद्रसंचालकांना दिवस/सत्रनिहाय स्वतःच्या व अधिनस्त उपकेंद्राच्या भरलेल्या माहितीचा तपशील लॉग-इन केल्यानंतर दिसू शकेल. सदर माहिती पूर्णपणे भरल्याची खात्री करुनच संबंधित परीक्षा केंद्राच्या उत्तरपत्रिका जमा करुन घ्याव्यात

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित
माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा मार्च- एप्रिल २०२२

# विभागीय मंडळ स्तरावरील सर्व घटकांना मार्गदर्शक सूचना-

१. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेतर्गत प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, प्रकल्प व तत्सम परीक्षा मंडळामार्फत दि.१४/०२/२०२२ ते दि.०३/०३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. सदर परीक्षा राज्यमंडळाने निर्गमित केलेल्या विशेष मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय सूचना विचारात घेवून आयोजित करण्यात याव्यात.

**महत्वाचे**- मंडळाने उपरोक्तप्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी कोरोनाबाधित झाल्यामुळे अथवा अन्य वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षा देवू न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर दि.३१/०३/२०२२ ते दिनांक १८/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात यावी. Out of Turn चा कालावधी उपरोक्त कालावधीतच समाविष्ट असेल, त्यामुळे Out of Turn साठी स्वतंत्र कालावधी देण्यात येणार नाही. यापूर्वी प्रयोग वही (जर्नल) व अनुषंगिक लेखन/प्रकल्प कार्य सादर न करु शकलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत या कालावधीत ते जमा करण्याची संधी देण्यात यावी.

२. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेतर्गत प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन इत्यादी परीक्षा दिनांक २५/०२/२०२२ ते दिनांक १४/०३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. सदर परीक्षा राज्यमंडळाने निर्गमित केलेल्या विशेष मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय सूचना विचारात घेवून आयोजित करण्यात याव्यात.

**महत्वाचे**- मंडळाने उपरोक्तप्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी कोरोनाबाधित झाल्यामुळे अथवा अन्य वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर दि.०५/०४/२०२२ ते दिनांक २२/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात यावी. Out of Turn चा कालावधी उपरोक्त कालावधीतच समाविष्ट असेल. त्यामुळे Out of Turn साठी स्वतंत्र कालावधी देण्यात येणार नाही.

३. मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) ची लेखी परीक्षा दि.०४/०३/२०२२ ते दि.३०/०३/२०२२ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) ची लेखी परीक्षा दि.१५/०३/२०२२ ते दि.०४/०४/२०२२ या कालावधीत प्रचलित पध्दतीने(ऑफलाईन) आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

४. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह शाळा उशीराने सुरू झालेल्या आहे. तद्नंतर काही ठिकाणी त्या वेळोवेळी बंद ठेवाव्या लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लेखनाचा सराव पुरेसा होऊ न शकल्यामूळे लेखी परीक्षेतील पेपरचा वेळ या परीक्षेला ७० ते १०० गुणांच्या पेपरसाठी ३० मिनिटे व ४० ते ६० गुणांच्या पेपरसाठी १५ मिनिटे वाढविण्यात येत असून त्यानुसार अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे.

५. या जादा वेळेव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जादा वेळेसह इतर सर्व सुविधा व सवलती कायम राहतील.

(उदा. तीन तासाच्या पेपरसाठी या परीक्षेला ३ तास ३० मिनीटे देण्यात आलेली आहे. या वेळव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदर तीन तासाच्या पेपरसाठी ६० मिनीटे प्रचलित जादा वेळेची सवलत देय राहील.)

६. **सदर लेखी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना २५ टक्के कपात केलेला अभ्यासक्रम वगळून उर्वरित ७५ टक्के अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा दयावी लागणार आहे.**

७. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात येईल. १५ पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या ठिकाणी एकापेक्षा अधिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये एकत्र करून परीक्षा घेण्यात येईल. मंडळामार्फत निश्चित केलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालये ही प्रचलित पध्दतीने मुख्य केंद्र राहतील व अन्य जोडण्यात आलेल्या शाळा/कनिष्ठ ही महाविद्यालये उपकेंद्र राहतील. मुख्य परीक्षा केंद्र असलेले शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य हे केंद्रसंचालक राहतील तसेच ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालय जोडण्यात आलेले आहे, त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य हे उपकेंद्रसंचालक म्हणून कार्यरत राहतील.

८. विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था ही त्याच्या स्वतःच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात यावी. मुख्य केंद्राच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी मुख्य केंद्रात व उपकेंद्राच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी संबधित उपकेंद्रातून परीक्षेसाठी प्रविष्ट होतील. उपरोक्तप्रमाणे अपवादात्मक परिस्थितीत एकापेक्षा अधिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये एकत्र करून उपकेंद्र निश्चितीकरण केलेले असल्यास विभागीय मंडळाने निश्चित केलेल्या एकाच उपकेंद्रावर विद्यार्थी प्रविष्ट होतील. कोणताही विद्यार्थी या कारणास्तव परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. एखादा विद्यार्थी आरोग्यविषयक कारणामुळे परीक्षेस गैरहजर राहिल्यास अशा गैरहजर विद्यार्थ्यांना मंडळामार्फत आयोजित पुरवणी परीक्षेस प्रचलित पध्दतीने प्रविष्ट होता येईल.

९. विद्यार्थ्यांची परीक्षा कक्षात बैठक व्यवस्था करण्यासाठी इमारतीतील जास्तीत जास्त आकारमानाच्या खोल्यांचा/ हॉलचा वापर करण्यात येणार आहे. वर्गखोलीमध्ये बैठक व्यवस्थेसाठी बेंच मांडणी करताना जास्तीत जास्त जागेचा वापर करुन दोन बेंचमध्ये पुरेसे अंतर ठेवणे, वर्गखोलीत प्रत्येक बेंचवर एक विद्यार्थी याप्रमाणे झिग-झॅग (Zig-Zag) पध्दतीने बसवण्याबाबत आणि बैठक व्यवस्थेसाठी शक्यतो मोठया आकारमानाच्या वर्गखोल्या/हॉल वापरण्याबाबत केंद्रसंचालक /उपकेंद्रसंचालक व परिरक्षकांना सूचित केले आहे, याप्रमाणे कार्यवाही होत असल्याची खातरजमा करावी.

१०. आपत्कालीन परिस्थितीत/ कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची इमारत अधिग्रहित/प्रतिबंधित करण्याची शक्यता असल्यास अथवा विलगीकरण केंद्र/क्वारंटाईन सेंटर म्हणून घेण्याची शक्यता असल्यास संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून यथोचित कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. याबाबत आवश्यकता भासल्यास आपणही आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करावी.

११. उपरोक्तप्रमाणे बैठक व्यवस्था करताना प्रत्येक विद्यार्थ्यांची सर्व विषयांची परीक्षा एकाच परीक्षा केंद्र/उपकेंद्रावर घेण्याचे नियोजन केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक यांचेमार्फत होईल असे पहावे.

१२. इ.१०वी व इ.१२ वी परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्यामुळे मुख्य परीक्षा केंद्रावर सकाळ सत्रात सकाळी ०८.५० पर्यंत व दुपार सत्रात दुपारी ०१.२० पर्यंत प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे पोहोच करणे आवश्यक राहील. तसेच उपकेंद्रावर सकाळ सत्रात सकाळी ०९.५० पर्यंत व दुपार सत्रात दुपारी ०२.२० पर्यंत प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे पोहोच करणे आवश्यक राहील. सदर वेळा तसेच परिरक्षक केंद्रापासून मुख्य परीक्षा केंद्र व उपकेंद्रांची अंतरे व प्रवासासाठी लागणारा कमाल वेळ विचारात घेऊन परिरक्षण केंद्र उघडणे, Thermal Screening द्वारे तापमान घेणे, परीक्षा केंद्रनिहाय प्रश्नपत्रिका पाकीटांची विभागणी करणे व ती परीक्षा केंद्रावर पोहचविणे इत्यादीबाबत परिरक्षक स्तरावरुन नियोजन करुन वेळेत कार्यवाही होणेसाठी आवश्यक सूचना संबंधितांना देण्यात याव्यात. अपवादात्मक परिस्थितीत उपरोक्त कार्यवाहीला अधिकचा वेळ लागणा-या प्रकरणात विभागीय मंडळानी आवश्यक सूचना/आदेश उपकेंद्रसंचालक, केंद्रसंचालक व परिरक्षकांना दयावेत.

१३. सर्व विभागीय मंडळांनी आपल्या अधिनस्त मुख्य परीक्षा केंद्रांची व उपकेंद्राची विषयनिहाय विद्यार्थी संख्या विचारात घेऊन आवश्यक उत्तरपत्रिका, पुरवण्या व इतर साहित्य लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी संबंधितांना उपलब्ध झाले असल्याची केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक व परिरक्षक यांच्याकडून खातरजमा करुन घ्यावी.

लेखी परीक्षेदरम्यान वेळोवेळी केंद्रसंचालक ,उपकेंद्रसंचालक व परिरक्षक यांचेकडून सदर साहित्याबाबत आढावा घेऊन आवश्यकता असल्यास ते संबंधितांना परिरक्षक/विभागीय मंडळाकडून उपलब्ध करुन दयावे.

१४. उर्वरित प्रश्नपत्रिकांची पाकिटे, फॉर्म नं.१ व २ आणि अनुषंगिक अहवाल त्या त्या दिवशी तसेच शिल्लक स्टेशनरी व इतर साहित्य परीक्षा संपल्यानंतर मुख्य केंद्र व उपकेंद्र यांच्याकडून परिरक्षकाकडे जमा क रण्यात येतील. त्यातील फॉर्म नं.१ व २ आणि अनुषंगिक अहवाल राज्यमंडळाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार आणि शिल्लक स्टेशनरी व इतर साहित्य परीक्षा संपल्यानंतर विभागीय मंडळाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार विभागीय मंडळाकडे प्राप्त करुन घ्यावे.

१५. केंद्रसंचालकांना दोन प्रतीत सेंटर हॉलरीज देण्यात येईल. सदर हॉलरीज पैकी एक मुख्य प्रत मुख्य केंद्रासाठी व दुसरी प्रत उपकेंद्रासाठी असेल. यामध्ये परीक्षा केंद्र/उपकेंद्रातील दिनांक, विषय, माध्यम व प्रविष्ट विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक इ. माहितीचा समावेश असेल. या हॉलरीजनुसार प्रत्येक दिवसाची बैठक व्यवस्था परीक्षा केंद्र व उपकेंद्रावर स्वतंत्रपणे करण्याबाबत केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

१६. हॉलरीजप्रमाणे प्रत्येक दिवशी सत्रनिहाय परीक्षा केंद्र/उपकेंद्रास आवश्यक प्रश्नपत्रिकांची संख्या विचारात घेऊन प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे परिरक्षकामार्फत मुख्य केंद्रास प्रचलित पध्दतीप्रमाणे वितरीत केली जातील याची दक्षता घ्यावी. हॉलरीजमधील तपशील विचारात घेऊन उपकेंद्रासाठी आवश्यक असणारी प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे मुख्य परीक्षा केंद्रामार्फत उपकेंद्रास निर्धारित वेळेत पुरवली जातील याबाबत आवश्यक नियोजन करावे.

१७.इ.१० वी परीक्षेसाठी शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र (७७) या विषयास प्रविष्ट होणा-या पुनर्परीक्षार्थ्यांसाठी/श्रेणीसुधार योजनेतर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी प्रश्नपत्रिकांच्या पाकिटांचा रंग **पिवळा** (Yellow) व इ. १२ वी (सर्वसाधारण अभ्यासक्रम) परीक्षेसाठी एन.एस.क्यू.एफ. अंतर्गत व्यावसायिक विषय Electronics & Hardware Installation Technician Peripherals (E- 5) व कलेचा इतिहास व रसग्रहण (६०), भारतीय संगीताचा इतिहास व विकास (६५), तालवाद्य (६९) या विषयांना प्रविष्ट होणा-या पुनर्परीक्षार्थ्यांसाठी /श्रेणीसुधार योजनेतर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी प्रश्नपत्रिकांच्या पाकिटांचा रंग **गुलाबी** (Pink) असेल.

१८.इ.१० वी व इ.१२ वीच्या उर्वरित सर्व विद्यार्थ्यांसाठी २५ प्रश्नपत्रिकांचे एक याप्रमाणे **ब्राऊन/खाकी** (Brown) रंगाची पाकिटे पुरविण्यात येतील.

सदर बाब विचारात घेवून प्रश्नपत्रिका वितरणाबाबत योग्य नियोजन करावे.

१९.प्रश्नपत्रिकांचे सिलबंद पाकिट विहित पध्दतीने परीक्षा कक्षात उघडल्यानंतर गैरहजर परीक्षार्थी किंवा अन्य कारणांमुळे शिल्लक राहीलेल्या प्रश्नपत्रिका पेपर संपेपर्यंत पर्यवेक्षकाने स्वत:कडेच जतन करुन ठेवणे, त्याचा गैरवापर होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घेणे तसेच पेपर संपल्यानंतर सदर शिल्लक प्रश्नपत्रिका केंद्रसंचालकाकडे जमा करणे इत्यादीबाबत सूचना संबधितांना देण्यात आलेल्या आहेत त्याची काटेकोर अंमलबजावणी होत असल्याची आपल्या स्तरावरुन वेळोवेळी खातरजमा करावी.

२०. परिरक्षण केंद्र ते मुख्य केंद्र प्रश्नपत्रिका वितरण करण्यासाठी प्रचलित पध्दतीने परिरक्षकाने सहायक परिरक्षकांची (रनर) नियुक्ती करावयाची आहे. मुख्य केंद्र ते उपकेंद्र प्रश्नपत्रिका वितरण करण्यासाठी परिरक्षकांनी मुख्य केंद्रसंचालकांशी विचारविनिमय करुन योग्य व्यक्तीची सहायक परिरक्षक (रनर) म्हणून नियुक्ती करावयाची आहे. ही नियुक्ती करताना माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांची अथवा अन्य व्यक्तींची (उदा. जिल्हा परिषद/म.न.पा. शाळांचे केंद्रप्रमुख, पदवीधर शिक्षक) संमतीने नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर व्यक्तींनी मुख्य परीक्षा केंद्रातून प्रश्नपत्रिकांची सिलबंद पाकिटे वेळेत ताब्यात घेवून ती उपकेंद्रावर पोहचवावी. तसेच संपूर्ण परीक्षा कालवधीत बैठे पथक म्हणून उपकेंद्रावर कार्यरत रहावे.

२१.उपकेंद्रावरील सर्व उत्तरपत्रिका व अनुषंगिक बाबी २० मिनीटात सर्व कामकाज पूर्ण करुन ३० मिनीटात मुख्य केंद्रावर पोहचतील असे नियोजन करावे. मुख्य केंद्राने उपकेंद्रावरुन प्राप्त झालेल्या उत्तरपत्रिकांचे व इतर साहित्यांचे संकलन करुन तद्नंतर ३० मिनीटात परिरक्षकांकडे पोहचवाव्यात अशा सूचना केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालक व परिरक्षक यांना देण्यात आलेल्या आहेत. त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घ्यावी. अपवादात्मक परिस्थितीत परिरक्षकाने विभागीय मंडळाकडून सूचना/आदेश देऊन प्रकरणपरत्वे निर्णय घ्यावा.

२२. विभागीय मंडळाने इतर सर्व अनुषंगिक बाबींची कार्यवाही 'परिरक्षक/केंद्रसंचालक /सहकेंद्रसंचालक इ.साठीच्या मार्गदर्शक सूचना' पुस्तिकेनुसार करण्याबाबत सर्व संबधितांना कळविण्यात यावे. प्रत्येक परिरक्षक केंद्र, मुख्य केंद्र व प्रत्येक उपकेंद्राला सदर पुस्तिका विभागीय मंडळामार्फत पुरविण्यात याव्यात.

२३. परीक्षेपूर्वी कामाचे नियोजन करण्यासाठी विभागीय मंडळांनी परिरक्षक व सर्व मुख्य केंद्रसंचालक यांच्या सभेचे आयोजन करुन सदर सभेत उपरोक्तप्रमाणे कामाचे नियोजन व तणावमुक्त वातवरणात काम करण्याकरीता सविस्तर सूचना देण्यात याव्यात.

२४. याशिवाय राज्यमंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षा व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ.१० ची परीक्षा मार्च-एप्रिल २०२२ साठी

(१) परीक्षार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प, अंतर्गत मूल्यमापन व तत्सम परीक्षा यासाठी विशेष मार्गदर्शक सूचना व विषयनिहाय तपशील

(२) परीक्षार्थ्यांसाठी लेखी परीक्षेकरीता विशेष मार्गदर्शक सूचना

(३) मुख्याध्यापक/प्राचार्यांसाठी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प, अंतर्गत मूल्यमापन व तत्सम परीक्षा यासाठी विशेष मार्गदर्शक सूचना

(४) मुख्याध्यापक/प्राचार्यांसाठी लेखी परीक्षेकरीता विशेष मार्गदर्शक सूचना

(५) केंद्रसंचालक/उपकेंद्रसंचालकांसाठी मार्गदर्शक सूचना

(६) परिरक्षकांसाठी मार्गदर्शक सूचना

इत्यादीबाबतच्या तपशीलवार सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करुन आपणास पाठविण्यात आलेल्या आहेत. त्यातील सर्व सूचना व मुद्द्यांची काटेकोर अंमलबजावणी करावी.

# विभागीय मंडळासाठी कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर अन्य सूचना

१. परीक्षेपूर्वी विभागीय मंडळातील सर्व शाखा, स्वच्छतागृहे, इमारत, संपूर्ण परिसराची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
२. विभागीय मंडळातील स्वच्छतागृहांची वेळोवेळी स्वच्छता करण्यात यावी व स्वच्छतागृहात साबण किंवा हॅन्डवॉश ठेवण्यात यावा.
३. विभागीय मंडळाच्या मुख्यप्रवेशद्वारावर प्रवेश देतांना कर्मचारी व सर्व संबंधित घटकांचे Thermal Screening द्वारे तापमान घेण्यात यावे. तापमान मर्यादेपेक्षा जास्त असल्यास खातरजमा करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.
४. विभागीय मंडळामध्ये आवश्यकतेनुसार उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे आयोजनासाठी परिक्षक/नियामक/मुख्य नियामक/अन्य संबंधित घटकांची बैठक व्यवस्था करताना सर्व घटकांमध्ये पुरेसे अंतर राहील याची दक्षता घ्यावी.
५. विभागीय मंडळात कार्यालयीन कामासाठी व परीक्षा विषयक कामकाजासाठी येणाऱ्या सर्व घटकांकडून कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासन व आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन होणे बंधनकारक असेल.
६. विभागीय मंडळात प्रवेश देताना प्रत्येक घटकाला मास्क वापरणे अनिवार्य करण्यात यावे.
७. विभागीय मंडळाच्या प्रवेशद्वाराजवळ सॅनिटायझर उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच विभागीय मंडळामध्ये परीक्षाविषयक काम करताना कर्मचारी व सर्व संबंधित घटकांना वेळोवेळी हात स्वच्छ करण्यासाठी हॅन्डवॉश/साबण उपलब्ध करुन देण्यात यावे.
८. विभागीय मंडळातील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच सर्व अभ्यागतांनी या कालावधीत उपरोक्त सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.
९. विभागीय मंडळ स्तरावर कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.
१०. बारकोड स्टिकर, युआयडी स्टीकर वितरीत करणे, उत्तरपत्रिका, पुरवणी व स्टेशनरी केंद्रावर पोहोच करणे, उत्तरपत्रिका विभागीय मंडळात जमा करुन घेणे/मूल्यमापन करणे, प्रश्नपत्रिकांचे पाकिटे तपासून परिरक्षकनिहाय ट्रंका भरणे, त्या वितरीत करणे, प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षेचे साहित्य वितरीत करणे व तत्सम परीक्षापूर्व, परीक्षा कालावधीतील व परीक्षोत्तर कालावधीतील कामे विभागीय मंडळ स्तरावर सुरु असणार आहेत. सदर कालावधीत सर्व मंडळ अधिकारी/कर्मचारी व संबंधित सर्व घटकांनी शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करुन कार्यवाही करावयाची आहे याची दक्षता घ्यावी.

## अतिशय महत्वाचे-

१. केंद्रसंचालकाने स्वतःच्या केंद्राच्या व अधिनस्त उपकेंद्रांच्या संदर्भातील मार्च-एप्रिल २०२२ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांचा दैनंदिन गैरमार्ग प्रकरण, विद्यार्थ्यांची उपस्थिती/अनुपस्थिती व अनुषंगिक माहिती प्रत्येक पेपर संपल्यानंतर ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. सदर माहिती ऑनलाईन सादर केल्यानंतरच उत्तरपत्रिका फॉर्म नं.१ व २ सह परिरक्षकाकडे जमा करुन घेण्यात येईल.

२. उपरोक्तप्रमाणे दैनंदिन माहिती ऑनलाईन भरण्यासाठी प्रत्येक केंद्रसंचालकांना लिंकचा तपशील विभागीय मंडळास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

सदर लिंकवर मुख्य केंद्राने माहिती भरुन नोंदणी करावी लागेल. सदर नोंदणी लेखी परीक्षा सुरु होण्याआधी दोन दिवस अगोदर पूर्ण करणे आवश्यक राहील.

३.मुख्य केंद्राने स्वतःची संबंधित माहिती ऑनलाईन पध्दतीने भरावी तसेच आपल्या अधिनस्त सर्व उपकेंद्रांकडून सदर माहिती वेळेत प्राप्त करुन घेऊन भरावी. मुख्य परीक्षा केंद्र व सर्व अधिनस्त उपकेंद्रांची माहिती भरुन झाल्यानंतर केंद्रसंचालकांना दिवस/सत्रनिहाय स्वतःच्या व अधिनस्त उपकेंद्राच्या भरलेल्या माहितीचा तपशील लॉग-इन केल्यानंतर दिसू शकेल. सदर माहिती पूर्णपणे भरल्याची खात्री करुनच संबंधित परीक्षा केंद्राच्या उत्तरपत्रिका जमा करुन घेण्याची कार्यवाही करण्याबाबत परिरक्षकांना सूचित करावे.

उपरोक्त क्र. १ ते ३ बाबत कार्यवाही करणे व त्याबाबत संपूर्ण संनियंत्रण करण्याची जबाबदारी विभागीय मंडळांची राहील तसेच याबाबतचा दैनंदिन अहवाल राज्यमंडळाकडे त्या-त्या दिवशी सादर करण्याची जबाबदारी खालील घटकांची राहील.

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी - १.विभागीय सहसचिव**
**२.शाखाधिकारी/शाखाप्रमुख/मंडळ कर्मचारी**

**माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी- १.विभागीय सहा.सचिव**
**२.शाखाधिकारी/शाखाप्रमुख/मंडळ कर्मचारी**

उपरोक्तप्रमाणे जबाबदारी निश्चित करुन त्याचे लिखित स्वरुपातील आदेश विभागीय मंडळ स्तरावर काढण्यात यावेत. सदर आदेशाची प्रत व याकामी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांचे संपर्क भ्रमणध्वनी क्रमांक राज्यमंडळ कार्यालयास परीक्षेपूर्वी पाच दिवस अगोदर सादर करण्यात यावेत. परीक्षेच्या काळात प्रत्येक दिवसाची माहिती त्याचदिवशी राज्यमंडळ कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहील. सदर अहवाल त्या त्या दिवशी सादर न झाल्यास संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल ही बाब संबंधितांच्या आदेशात नमूद करण्यात यावी.

*******************************